# सायबर सुरक्षा अभियानासाठी 'गोगटे'च्या विद्यार्थ्यांची निवड

रत्नागिरी, ता. २२ : गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची निवड क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर सुरक्षा जागरूकता अभियानासाठी झाली आहे. हे विद्यार्थी विविध सामाजिक घटकांना मार्गदर्शन करून त्यांच्यात सायबर जागरूकता निर्माण करण्याचे कार्य करणार आहेत.

या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा क्लबचे प्रशिक्षण विमाननगर, पुणे येथील क्विक हिल फाउंडेशनच्या कार्यालयात देण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना अजय शिर्के, सुगंधा दानी, गायत्री केसकर यांनी मार्गदर्शन केले. क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना



पुणे : क्विक हिल फाउंडेशनच्या कार्यालयात सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड झालेले विद्यार्थी. सोबत कंपनीचे अधिकारी.

आणि शिक्षकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पार्थ मुळ्ये (अध्यक्ष), वैष्णवी शिरसाट (सचिव), कौशिक मुसळे (कार्यकारी संचालक), वेदांग पाटणकर (जनसंपर्क संचालक) यांचा समावेश आहे तर या अभियानासाठी शिक्षक समन्वयक केतन जोगळेकर यांची निवड करण्यात आली.

गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले, निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीबरोबरच सामाजिक जबाबदारीही पार पाडावी. महाविद्यालयाचे हे दुसरे वर्ष आहे, ज्यामध्ये महाविद्यालय क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सायबर जागरूकता अभियान राबवत आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेच्या उपप्राचार्या डॉ. अपर्णा कुलकर्णी आणि कॉम्प्युटर सायन्स आणि आयटी विभागाच्या समन्वयक प्रा. अनुजा घारपुरे यांनी शुभेच्छा दिल्या.